वयोवृद्धः मनोयुवा

## महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई


संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२
कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.



# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

वर्ष-२९ | अंक-१२ | डिसेंबर २०२१



जयंती : दि. २४ डिसेंबर

**खरा तो एकचि धर्म । जगाला प्रेम अर्पावे ।।**

# आई-वडील आणि ज्येष्ठ नागरिक चरितार्थ व कल्याण कायदा,२००७ व नियम २०१०

अरुण रोडे
अध्यक्ष, फेस्कॉम, पुणे.
मो. ९८५०८८४३७५

१) प्रारंभिक
२) आई, वडिल आणि ज्येष्ठ नागरिकांचा चरितार्थ
३) वृद्धाश्रमांची स्थापना
४) ज्येष्ठ नागरिकांच्या चिकित्सेसाठी सहाय्य
५) ज्येष्ठ नागरिकांचे जीवन आणि संपत्तीचे संरक्षण
६) अपराध आणि विचारणा संबंधीप्रक्रिया
७) संकिर्ण

भारत सरकारने सन १९९९ मध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठीचे राष्ट्रीय धोरण जाहीर केले.

धोरण म्हणजे :- उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी केलेला मसुदा.

उद्दिष्ट्य :- ज्येष्ठांचे आरोग्य/अर्थार्जना/रोजगार/संरक्षण/दूव्यविहार नियंत्रण/एकाकीपणा व सामाजिक प्रश्न यावर धोरणांचा मसुदा ठरविणे.

याच धोरणांचा (एक भाग म्हणुन आई, वडिल व ज्येष्ठ नागरिक कल्याण व चरितार्थ कायदा, २००७ व त्यांचे नियम, २०१० अस्तित्वात आले, निर्मिती झाली.

राज्य सरकारने राजपत्रात नोटिफाय केल्यावर हा कायदा २३ जुन, २०१०ला राज्याने व परदेशी राहणाऱ्या भारतीयांनाही लागू आहे.

**कायद्याची वैशिष्ट्ये :-**

१) कोर्ट-न्यायालय नाही
२) वकील नाही
३) कोर्ट फी नाही
४) पुरावा-इव्हिडन्स अॅक्ट लागू नाही.

यात ७ प्रकरणे व ३२ कलमे (सेशन्स) आहेत. कोणासाठी? तर स्वत:चा चरितार्थ चालवू शकत नाही अशांसाठी हा कायदा आहे. आई, वडिल हे ६० वर्षांचे आतील असतील त्यांना व ६० वर्षावरील जेष्ठांना हा कायदा लागू आहे.

**प्रकरण पहिले प्रारंभिक (व्याख्या)**

१) चाईल्ड - बालक :-

१८ वर्षावरील परंतु या कायद्यात बालक म्हणजे मुलगा/मुलगी/नात/नातू/जावई/ १८ वर्षाचे वरील असा अभिप्रेत आहे.

२) निर्वाह - चरितार्थ :-

अन्न-वस्त्र-निवारा-आरोग्य-उपचार यांचा समावेश

३) ज्येष्ठ नागरिक :-

युनोची व्याख्या :- वयाची ६० वर्षे पुर्ण केलेली व्यक्ती (स्त्री-पुरूष). मात्र आई-वडिल जेष्ठ नागरिकच पाहिजे असे नाही.

४) न्यायाधिकरण :-

निर्वाह न्यायाधिकरण कलम ७ नुसार स्थापन केलेले.

५) मालमत्ता :-

स्थावर-जंगम-सर्व वडिलोपार्जित/स्वकष्टार्जित/शेअर्स/मुदत ठेव पावत्या.

६) वेलफेअर :-

कल्याण-विरंगुळा केंद्र व इतर सुविधा

७) मायनर (अज्ञान) :-

१८ वर्षाखालील.

८) नातेवाईक :-

नि:संतान ज्येष्ठांची मालमत्ता कायदेशीर वारस

**२) प्रकरण दुसरे महत्वाचे - आई-वडिल ज्येष्ठ नागरिकांचा चरितार्थ**

आई-वडिल ज्येष्ठच पाहिजे असे नाही. ज्येष्ठ नागरिक मात्र ६० वर्षावरीलच पाहिजेत. चरितार्थांचे साधन नाही ते नातेवाईक किंवा मुलांकडून निर्वाह भत्ता मिळवू शकतात. त्यासाठी हा कायदा आहे.

निर्वाह भत्ता मागणी अर्ज करावा लागतो / स्वत: किंवा

अर्जदार निरक्षर असल्यास त्याचे वतीने कोणीही अर्ज करू शकतो / अथवा १८६०चे कायद्याने नोंदणीकृत संस्था अर्ज करू शकते./ तसेच न्यायाधिकरण - 'सू-मोट्यू' स्वत:चे अधिकारात अर्ज करू शकते.

**अर्ज करणारा**– पहिली पार्टी 'वादी'

**निर्वाह भत्ता देणारा**– दुसरी पार्टी 'प्रतिवादी'

प्रत्येक तालुकावार निर्वाह न्यायाधिकरण स्थापित करावे. त्याचा अधिकारी 'प्रांत' हा पदसिध्द/ अध्यक्ष राहील. (सबडिव्हिजनल ऑफीसर)

अर्जात त्रुटी राहिल्या तर दुरुस्तीसाठी पाठविला जातो. अर्ज कोठे ही 'एस.डी.ओ.' कडे करता येतो. अर्ज दिल्यानंतर 'बी' फॉर्म रजिस्टरमध्ये नोंद केली जाते. नोंदणी क्रमांक लिहून पोहोच दिली जाते.

**ट्रिब्युनल**– प्रथम प्रतिवादीला नोटीस पाठविल व त्यांचे म्हणणे विशिष्ठ तारखेला मागवेल न आल्यास एक तर्फी निकाल दिला जाईल. यात वाद निर्माण झाले तर तडजोड समेट- कौन्सिलिंग साठी समेट अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाईल.

**समेट अधिकारी**– सोशल वर्कर, कायद्याचे ज्ञान असणारे यांची यादी असणे, त्यांना नेमले जाते. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण हे मेन्टेनन्स अधिकारी राहतील. एक महिन्यात समेट अधिकाऱ्याने अहवाल न्यायाधिकरणाला सादर करणे. समेट घडेल/ घडला नाही तरी अहवाल एक महिन्यांत देणे.

**यानंतर**– न्यायाधिकरण दोन्ही पक्षांना समझोता मान्य आहे कां? विचारेल व त्यावर पुढील शिक्का मोर्तब प्रतिपक्षाची आर्थिक स्थिती/ कमाई व मागणी करणाऱ्याची अपेक्षा- यावर निर्णय न्यायाधिकरणाने ९० दिवसांत नोटीस दिल्याच्या तारखेपासूनचा कालावधी धरुन दिला जाईल.

**अपिलियन– न्यायाधिकरण**– कलेक्टर पातळीवर व अपील फक्त आई-वडील व ज्येष्ठ नागरिकच करु शकतात. पाल्यांना अपीलचा अधिकार नाही. अपील निकालानंतर ६० दिवसांत केले गेले जाईल.

**कमाल निर्वाह भत्ता**– अर्जदाराला विरुध्द पक्षाने द्यावयाच्या निर्वाह भत्त्याची कमाल मर्यादा रु. १०,०००/- प्रति महिना किंवा विरुध्द पक्षकाराला सर्व मार्गाने मिळणारे एकत्रित उत्पन्न भागिले त्याच्या कुटुंबातील व्यक्ती अर्जदारासह याप्रमाणे येणाऱ्या रकमेपेक्षा जास्त नाही असा निर्वाह भत्ता देण्याचे न्यायाधिकरण आदेशीत करील. यात आता रु.१० हजारांची मर्यादा काढून टाकली आहे व मुलगी व जावई यांचा समावेशही केला आहे.

**३) प्रकरण तिसरे– वृध्दाश्रमांची स्थापना**

१) राज्य सरकार सहज संपर्क स्थानावर तेवढ्या संस्थेमध्ये वृध्दाश्रम क्रमाक्रमाने स्थापित करेल. प्रारंभी प्रत्येक जिल्ह्यात किमान एक व १५० निराधार ज्येष्ठांसाठी.

२) वृध्दांश्रमांच्या प्रबंधासाठी एक योजना विहित करेल. त्या चिकित्सा देखरेख-सेवा- मनोरंजन साधनांसाठी आवश्यक सुविधा असतील.

३) ज्येष्ठ नागरीक निराधारांना प्रथम प्राधान्य.

**४) प्रकरण चौथे– ज्येष्ठ नागरिकांच्या चिकित्सेसाठी सहाय्य**

शासकीय दवाखान्यात निःशुल्क सेवा, सुविधा दिली जावी. बिस्तर-बेड, असाध्य, घातक आजार जरा चिकित्सा- जिल्हा रुग्णालयात उपचार.

**५) प्रकरण पाचवे– ज्येष्ठ नागरिकांचे जीवन व संपत्तीचे संरक्षण**

मिडियाचा वापर/ पोलिस अधिकारी व कक्ष हेल्पलाईन क्र. १०९०, नॅशनल हेल्पलाईन फॉर सिनिअर सिटीझन्स टोल फ्री क्र. १४५६७ समाज कल्याण खाते यांचे वर जबाबदारी. हेल्पलाईन/ प्रत्येक पोलिस स्टेशनला ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष **'भरोसा सेल'**.

**६) प्रकरण सहावे– अपराध आणि विचारणासंबंधी प्रकिया**

ज्येष्ठांसाठी प्रति दुर्व्यवहार नियंत्रण- दुर्व्यवहार करणाऱ्यांस तीन महिने कारावास व रक्कम रु. ५ हजार दंड किंवा दोन्ही होऊ शकते. ''१५ जुन जागतिक ज्येष्ठांप्रती दुर्व्यवहार नियंत्रण दिवस''

**७) प्रकरण सातवे– संकिर्ण**

नियुक्त सर्व अधिकारी हे लोक सेवक असतील, सेवाभावी काम करतील, समाज कल्याण खाते व पोलिस डिपार्टमेंट कर्तव्य- हक्क- जबाबदाऱ्या.

# सक्रियता - पदाधिकारी - सर्व सभासद व गांव तिथे संघ

अंजुमन खान
मो. ९४२२५८३००४

**फेस्कॉम ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त आपणां सर्वांना शुभेच्छा..!**

एक असामान्य व्यक्तिमत्व, स्वतः ज्येष्ठ नसुन देखील, ज्येष्ठांच्या उर्वरित आयुष्यात आनंद फुलविणेसाठी धडपडणारे व्यक्तिमत्व म्हणजेच ''डॉ. राधाकृष्ण भट''. कर्मभुमी डोंबिवली आणि कर्मभुमीतुनच ज्येष्ठ नागरिकांच्या उर्वरित जीवनाची पालवी फुटू लागली. कळीचे फुलात रुपांतर होणेस सुरुवात झाली. ज्येष्ठ नागरिकांच्या व्यथा आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचविणेचे महान कार्य त्यांचे हातून घडले. ज्येष्ठांच्या व्यथा जाणवुन घेवून त्या व्यथा दूर करणेचा मनोमन संकल्प करुनच आणि तेही तरुण वयात. डॉ. भट यांनी ज्येष्ठ नागरिकांना एकत्र करुन भारतातील सर्वच ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक आणि शारीरिक प्रश्नांचा अभ्यास करुन त्यावर त्यांनीच मार्ग काढला. गांवोगांवचे ज्येष्ठ नागरिक गावागावात एकत्र झाले तरच त्यांची मानसिकता सुधारेल आणि शारिरीक व्याधी दुर होवु शकतील हे जाणले. या संकल्पनेतुनच ज्येष्ठ नागरिक संघाचा उदय झाला. त्यांनी तरुणपणीच, १० सप्टेंबर १९७७ रोजी भारतातील पहिला ज्येष्ठ नागरिक संघ डोंबिवली येथे काढुन भावी महासंघाचा पाया रचला. १२ डिसेंबर १९८० रोजी महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाची स्थापना केली आणि संघाच्या विस्ताराला सुरुवात केली.

डॉ. राधाकृष्ण भट आणि त्या काळातील पदाधिकारी यांची ज्येष्ठ नागरिक महासंघाची संकल्पना वैशिष्ट्यपूर्ण होती. याबाबत त्यांची खालील स्वप्ने कौतुकास्पद होती.

१) महासंघ हा ज्येष्ठांचे हक्क आणि समस्या याबाबत सतत जागृत रहावा.

२) राज्यातील सर्व ज्येष्ठ नागरिकांचा कैवारी आणि समाजोपयोगी कार्यात अग्रेसर रहावा.

३) राज्यातील प्रत्येक गांवात (शहरी/ग्रामीण) फेस्कॉमशी संलग्न ज्येष्ठ नागरिक संघ असावा.

४) प्रत्येक गांवात/ शहरात समाज मंदिराच्या स्वरुपात जातीय सलोखा, एकजुट व राष्ट्रीय एकात्मता वाढविणारे विरंगुळा केंद्र असावे.

५) महासंघात तज्ञ मंडळी असावीत, या अनुभवी तज्ञांचा फायदा समाजास व राज्यास व्हावा.

६) ज्येष्ठ नागरिक संघ ग्रामीण क्षेत्राचा उत्कर्ष साधणारा, समस्या सोडविणारा, आदिवासी क्षेत्रात व तळागाळातील ज्येष्ठांचे जीवन सुसह्य करणारा असावा.

७) निराधार महिलांचे व विधवांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविणारे, महिलांना राष्ट्रीय प्रवाहाची दारे उघडून देणेसाठी प्रयत्न करणारे ज्येष्ठ नागरिक संघ असावेत.

ज्येष्ठ नागरिक संघाचा उदय आणि त्याची संकल्पना महासंघाच्या पदाधिकारी यांना विचार करावयास लावणारी होती आणि आहे. महासंघाच्या पूर्वीच्या स्वप्नाप्रमाणे आपण काय करत आहोत हे चिंतनीय आहे, आज फेस्कॉममध्ये ४४८६ ज्येष्ठ नागरिक संघ आहेत याचा अर्थ हे संघ ४४८६ गावात आहेत असा होत नाही. बऱ्याच गांवात २/२, ३/३ संघ आहेत. माझ्या माहितीच्या एकाच गावांत तर ६ संघ आहेत हे का व कशासाठी?

साधारण २०१५ पुर्वी ज्येष्ठ नागरिक संघाची विचारशैली वरील स्वप्नांशी कांही अंशी जुळणारी दिसत होती. परंतु वयोमान जसे वाढू लागले तसे जुन्या पदाधिकाऱ्यात अहंभाव निर्माण झाला. 'मी' पणा निर्माण झाला. याचाच परिणाम एकाच गावात २/३ संघ निर्मितीचा झाला. याचबरोबर तालुका स्तरावरील ज्येष्ठ नागरिक संघानी या स्वप्नांनाच छेद दिलेला पहावयास मिळेल. तालुका स्तरावरील ज्येष्ठ नागरिक संघाची सभासद संख्या पाहिली की ती १००० पेक्षाही जास्त दिसेल. हे १००० सभासद एकाच गावातील दिसणार नाही तर जवळपासचे ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिक हे सभासद म्हणून दिसून येतात. महासंघाच्या स्वप्नांचा त्यांनी विचार व अभ्यास केला असता तर ग्रामीण भागात पूर्वीच ज्येष्ठ नागरिक संघाची संख्या वाढली असती, पण या ठिकाणी स्वार्थ निर्माण झाला असेच म्हणावे लागेल. कांही अंशी ग्रामीण भागात संघ गठीत होणेस खीळच बसली हे आपणांस जाणवेल.

अलिकडचे काळात ज्येष्ठ नागरिक संघात वाढ झाली हे निश्चित पण गांवे कमी आणि संघ जास्त अशी परिस्थिती झाली. या कारणांचाही विचार केला पाहिजे. महासंघास फक्त संघ वाढीचीच अपेक्षा नाही तर ग्रामीण भागात प्रत्येक गावात संघ वाढीची अपेक्षा होती आणि आहे हे विसरुन चालणार नाही. महासंघाचा उद्देशच प्रत्येक गांवी ज्येष्ठ नागरिक संघ गठीत होऊन त्या गावांतील प्रत्येक ज्येष्ठ नागरिकांच्या व्यथा दुर व्हाव्यात, मानसिकदृष्ट्या व आरोग्यदृष्ट्या प्रत्येक ज्येष्ठ नागरीक सुदृढ रहावा, अति दुर्बल घटकांचा आर्थिक परिस्थितीत सुधारणा व्हावी हा आहे. या दृष्टीने किती संघात प्रयत्न सुरु आहे? फेस्कॉमचे पदाधिकारी किती प्रयत्नशील आहेत? प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष व पदाधिकारी हे फेस्कॉमचेच पदाधिकारी आहेत. अलिकडच्या काळात संघ संख्या वाढली, पण आज त्यापैकी किती संघ क्रियाशील आहेत याचे चिंतन करणे गरजेचे आहे. या संघापैकी किती संघ अक्रियाशील आहेत हे पाहणे- विचार करणे महत्वाचे आहे. ते संघ अक्रियाशील का राहिले याच्या चिंतनाची गरज निर्माण झाली आहे.

आता या ठिकाणी ''कोरोना'' चे कारण पुढे आणले जाईल. याबाबत आपले रेकॉर्ड पहा. मार्च २००० अखेर किती संघ अक्रियाशील होते, किती गावापर्यंत फेस्कॉम पोहचले नाही, आता कोरोनामुळे तर यात अधिकच भर पडली आहे. अक्रियाशील संघाची संख्या वाढली आहे. त्यामुळे अक्रियाशील संघाबाबत कोरोना हे कारणच होऊ शकत नाही. आरोग्याच्या दृष्टीकोनातून/ लसीकरणाचे दृष्टीकोनातून संघांना घरी बसून काम करणेची अधिकच संधी होती हेही विसरुन चालणार नाही. ज्येष्ठ नागरिक संघ अक्रियाशील राहणेचे प्रमुख कारण प्रादेशिकचे/ जिल्हा/ तालुका समित्यांचे अध्यक्ष याचा संपर्क नसणे हेच आहे. ''संपर्क'' हे कोणत्याही यशाचे प्रमुख ''गमक'' आहे. आज विविध अध्यक्ष/ पदाधिकारी यांची मानसिकता ''संघांनी आपल्याकडे आले पाहिजे'', ''कार्यक्रम मला विचारुन ठरविला पाहिजे'', ''कार्यक्रमात मला मान दिला पाहिजे'' अशी झाली आहे.

एका उच्चशिक्षित पदाधिकारी यांची हीच भावना होती आणि आजही आहे. कांही ठिकाणी तर यापेक्षाही भयानक स्थिती दिसेल. ''महासंघाला काय विचारायचयं'', ''त्यांना काय कळतयं'', ''त्यांच्यापेक्षा मीच हुशार आहे'' ही भावना जुन्या पदाधिकाऱ्यांत स्थान धरुन बसली आहे. यामुळेच संघ अक्रियाशील राहणेस मदत झाली आहे असे म्हणावे लागेल. या परिस्थितीत देखील त्यांचा अज्ञानीपणा व अभ्यासू प्रवृत्ती नसणे हे देखील अतिशय महत्वाचे कारण आहे. आपला अज्ञानीपणा जगासमोर उघडा पडू नये यासाठी देखील ते संघापर्यंत जाणेस घाबरत असावेत.

आज आपण कोठेही गेलो तर प्रामुख्याने ग्रामीण भागात फेस्कॉमने आम्हास काय दिले? व आमचेसाठी काय करतेय? असे विचारले जाते. त्यांचे समाधान करणेस पदाधिकारी कमी पडतात, हे संघ अक्रियाशील राहणेचे देखील प्रमुख कारण आहे. याबाबत एक उदाहरण द्यावयाचे झालेस ओळखपत्राचे देता येईल. याबाबत शासनाचे आदेश काय आहेत, आपण काय मागतोय हेच आपणांस माहित नाही. ओळखपत्र आणि प्रमाणपत्र यातील फरक आपणांस कळत नाही, तर पुढच्या व्यक्तिस आपण काय सांगणार? याबाबत फेस्कॉम अध्यक्ष यांनी पुणे जिल्ह्यात मार्ग काढला. त्यांनी शिकवले आणि पूर्तता व्हायला मदत झाली. याबाबत सर्व प्रादेशिक विभागांना कळवून देखील त्यांच्या जिल्ह्यात या सुधारणा कां होऊ शकल्या नाहीत. ज्येष्ठ नागरिक धोरण, लाभाच्या योजना आपण ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकांपर्यंत पोहंचविणेस कमी पडलो आहोत याचे प्रमुख कारण अभ्यास नाही असेच म्हणावे लागेल. कमी संपर्क आणि अभ्यास यामुळेच संघ अक्रियाशील झाले आहेत हे त्रिवार सत्य असून अक्रियाशील संघ क्रियाशील करावयाचे असेल तर प्रादेशिक विभागाच्या व जिल्हा/ तालुका समन्वय समितीच्या अध्यक्ष व पदाधिकारी यांनी स्वतः अभ्यास करुन संपर्क वाढविणे आवश्यक आहे. विविध कार्यक्रमातील उपस्थिती बंदकरुन ''कार्यशाळा'' च्या निमित्ताने गावोगावी जाऊन प्रबोधन करणे आवश्यक आहे.

अभ्यासपूर्व संपर्कामुळे दोन गोष्टी साध्य होणार आहेत. आज जे संघ अक्रियाशील आहेत त्या संघाचे अध्यक्ष व सदस्य यांना भेटलेमुळे दुभंगलेली मने जुळावयास मदत होईल. फेस्कॉमने ज्येष्ठांसाठी काय केले आणि काय करतंय हे त्यांना समजेल. प्रत्येक ज्येष्ठ नागरिकांस मानसिक, शारिरीक व आर्थिकदृष्ट्या कसे सक्षम करता येईल, ज्येष्ठ नागरिक धोरण काय आहे, कोणासाठी आहे, संजय गांधी योजनेअंतर्गत लाभाच्या

योजना काय आहेत, पात्र लाभार्थींना आर्थिकदृष्ट्या कसे सक्षम करता येईल, हे कळेल. ज्येष्ठ नागरीकांना होणाऱ्या विविध त्रासातून मुक्त करणारे आईवडिल आणि ज्येष्ठ नागरीक यांच्या चरितार्थ व कल्याण्यासाठी अधिनियम २००७/२०१० काय आहे, याचा प्रचार व प्रसार होऊ शकेल.

ज्येष्ठ नागरिकांच्या अनेक मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत. त्या कोणत्या व त्या सोडविणेसाठी फेस्कॉमचे प्रयत्न याची ग्रामीण भागातील ज्येष्ठांना माहिती होईल.

शेवटी महत्वाचे म्हणजे पदाधिकारी यांचा अभ्यासपूर्ण संपर्क दौरा महत्वाचा असून केवळ या अभ्यासपूर्ण संपर्क दौऱ्यामुळे अक्रियाशील संघ क्रियाशील होणेस ''गाव तेथे संघ'' होणेस मदत होणार आहे.

मित्रांनो, ग्रामीण भागाने बोलविणेची वाट बघू नका, कार्यक्रमाची अपेक्षा धरु नका, ज्येष्ठ नागरीक संघ सदस्य आणि फेस्कॉम यांचेच नाते जुळवा आणि संपर्क वाढवा, मने जुळविणेचा प्रयत्न करा, प्रेमाने नाती जमवा, जवळीक साधा आणि साने गुरुजींच्या प्रार्थनेप्रमाणे 'जगाला प्रेम अर्पावे' याच्या प्रयत्नास सुरुवात करा, हेच महासंघाच्या ४२ व्या वर्षाच्या पदार्पणाचे प्रसंगी सुचवावेसे वाटते.

धन्यवाद !

* * *

## मनोरंजन, लेखन, सामाजिक भान हीच माझ्या जीवनाची शिदोरी

नारायण वासुदेव दुमालदार, सोलापूर
भ्रमणध्वनी - ९४२३०६८६२८

सेवानिवृत्तीचा काळ कसा घालवायचा? याचे मी कोणतेही नियोजन केलेले नव्हते. दि. ३१ जुलै २००५ रोजी मी 'भारतीय संचार निगम' (बीएसएनएल) मधून निवृत्त झालो. त्यानंतर दोन-तीन दिवसातच माझी भेट जवळच्या एका माजी अधिकाऱ्यांशी झाली. निवृत्तीचा काळ कसा घालवायचा याचे नियोजन त्यांनीच मला करुन दिले. त्यांच्या प्रेरणेनेच मी 'सापेक्ष ज्येष्ठ नागरिक' संघटनेचा आजीव सभासद झालो.

या संघात मी अधिक वेळ देऊ लागल्याने, इतर ज्येष्ठांच्या व्यथा ऐकून मी व्यथित झालो. त्यांच्याजवळ जाऊन, त्यांच्या अडचणी सोडवण्याची संधी मला मिळाली. मी अनेक उपक्रमात सक्रिय होऊन त्यातून आनंद घेऊ लागलो. या संघटनेच्या व्यापातूनही थोडासा वेळ काढून मी इतर कामांकडेही लक्ष देऊ लागलो. 'मनोहारी-मनोयुवा' या राज्यस्तरीय मासिकाची सभासद संख्या वाढविण्यासाठी नेटाने प्रयत्न करु लागलो. त्यात मला बरेचसे यश मिळाले. मला सामाजिक कार्याची मनापासून आवड आहे. त्यासाठी मला घरातून स्वातंत्र्यही मिळते. त्यांचे म्हणणे एवढेच असते की, 'आपली प्रकृती सांभाळून इतरांना सेवा द्या.' त्यांच्या म्हणण्यानुसार मी माझ्या प्रकृतीकडे अधिक लक्ष देऊन उर्वरित वेळेत सामाजिक कार्याकडे लक्ष देतो. शुध्द शाकाहारी आहार, पुरेशी विश्रांती, जमेल तेवढे वृत्तपत्रीय लेखन, चिंतामुक्त जगणे, इत्यादी कारणांमुळे माझी प्रकृती उत्तम ठेवण्याचा मी प्रयत्न करीत असतो.

'अवयवदान चळवळीला' चालना देण्याचे काम करीत असतो. 'अवयव चळवळी'च्या दोन संस्था स्थापन करुन, याचा प्रचार नि प्रसार होण्यासाठी अनेक कार्यकर्ते तयार केले. माझ्या पंच्याहत्तरीनिमित्त पंच्याहत्तर कविता लिहिण्याचा संकल्प मी केला होता. त्या सर्व कविता माझ्या 'अमृत प्रतिमा' या काव्यसंग्रहात आहेत. सार्थक आणि अमृत प्रतिमा ही माझी दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

मला संगीतही आवडते. ज्येष्ठ नागरिक संघाच्या अनेक विधायक कार्यामुळे माझ्या मित्रमंडळींचा विस्तार झपाट्याने झाला. मनोरंजन, सामाजिक भान, सांघिक आपुलकी, अनेकांच्या गाठी-भेटी हीच माझ्या जीवनाची शिदोरी आहे. माझ्या शालेय मित्रांचा स्नेहमेळावा, काव्य मैफिलीसारखे उपक्रम मी आयोजित करीत असतो. विविध विषयांवर स्फूट लेखन करतो. यातून मला पुनः प्रत्ययाचा आनंद मिळतो. भम्रणध्वनीच्या माध्यमातून मित्रांशी भरभरुन गप्पा मारतो. साहित्यिक, सांस्कृतिक कार्यक्रमांना आवर्जुन हजेरी लावतो. मला नेहमीच असे वाटते की, ''ज्येष्ठांनी वयाने वाढावे, पण वृत्तीने मात्र नेहमीच प्रसन्न राहावे'' मी दररोज नातवांशी दंगामस्ती करतो. त्यांच्यासोबत खेळतो. त्यातून आनंद मिळतो. मन प्रसन्न होते. हाच माझा प्राणवायू, हीच माझी ऊर्जा आणि हेच माझे शक्तीवर्धक औषध आहे.

* * *

# फेस्कॉम डे - ४२ वा स्थापनादिन

निर्मला भोस्कर

ज्येष्ठ तेच श्रेष्ठ
आपली भारतीय संस्कृती आहे महान,
पिकलं पान आहे घराची शान म्हणून,
सर्वांनी द्यावा ज्येष्ठांना मान.

ज्येष्ठांचे प्रश्न, समस्या यांची उकल व्हावी, त्यांचे उर्वरित आयुष्य सुखी, समाधानी, आरोग्यपूर्ण, निरामय व सन्मानाने जगता यावे यासाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य पातळीवरील कोणते धोरण असावे यासाठी ज्येष्ठ नागरिक संघटनेची स्थापना झाली आहे. जगात ज्येष्ठांच्या समस्या, प्रश्न आणि अडचणींना वाचा फोडण्यासाठी सन १९६० पासूनच ज्येष्ठ नागरिक संघटना व संघ स्थापनेस सुरुवात झालेली आहे. भारतात सर्वप्रथम महाराष्ट्र राज्यात दिनांक १२ डिसेंबर १९८० ला डॉ. राधाकृष्ण भट या ३५ वर्षे युवकांमध्ये ज्येष्ठांबद्दल असलेली आस्था, ज्येष्ठांचे प्रश्न, समस्या व होणारे हाल हे पाहून त्यांनी ज्येष्ठ नागरिक संघटनेची स्थापना केली, त्यानंतर भारतात १९८१ ला आयस्कॉन स्थापन झाली.

यशदा ची पुणे विद्यापीठामार्फत ज्येष्ठांसाठीचे केंद्र व राज्याचे आर्थिक लाभाच्या योजना, उपयुक्त कायदे यावर सर्व ३६ जिल्ह्यात व तालुक्याच्या ठिकाणी कार्यशाळांचे आयोजन केले जात आहे. ज्येष्ठांचे प्रबोधन कार्य चालू राहावे या उद्देशाने डॉ. राधाकृष्ण भट व्याख्यानमाले अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रभर व्याख्याने आयोजित केली जातात. ज्येष्ठांच्या साहित्य कलेला वाव मिळावा यासाठी मनोहारी मनोयुवा हे मासिक दि. १ जानेवारी २०१८ पासून नियमित प्रकाशित होत आहे. या मासिकातून ज्येष्ठ नागरिकांना आपल्या साहित्य प्रकाशनाला वाव मिळाला आहे.

सध्या फेस्कॉमचे क्रियाशील, कर्तव्यदक्ष, प्रतिभावंत, शिस्तप्रिय, दूरदृष्टी असणारे अध्यक्ष आदरणीय अरुण रोडे यांचा तर गाव तिथे संघ हा संकल्प आहे. त्या दृष्टीने संपूर्ण महाराष्ट्रात वेगाने वाटचाल चालू आहे. उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग हा ज्येष्ठ नागरिक संघटनेत अतिशय क्रियाशील असा विभाग असून सध्या विभागाचे अध्यक्ष अशोक तेरकर आहेत. अशोक तेरकर मागील १२ वर्षांपासून ज्येष्ठ नागरिक संघटना कार्यात सहभागी आहेत. पहिले तीन वर्ष नांदेड जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघटना समन्वय समिती अध्यक्ष होते. त्यानंतर महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ फेस्कॉमचे अतिरिक्त मुख्य सचिव तीन वर्ष होते. मागील ४ वर्षांपासून मराठवाडा प्रादेशिक विभाग उत्तर फेस्कॉमचे अध्यक्ष आहेत. जिल्हा ज्येष्ठ नागरिक दक्षता समितीचे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती सदस्य आहेत. जिल्हा न्यायालयात असलेल्या जिल्हा न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेत असलेल्या ज्येष्ठ नागरीक समन्वय समितीचे सदस्य आहेत. संध्या, छाया वृध्दाश्रमाचे उपाध्यक्ष आहेत. ते कर्तव्य तत्पर, कृतिशिल, प्रतिभावंत असल्याने विभागाचे काम अतिशय दर्जेदार आहे. त्यांच्या कारकिर्दीतच फेस्कॉमचे राज्यस्तरीय अधिवेशन दि. १५ डिसेंबर २०१९ ला नांदेड नंदिग्राममध्ये संपन्न झाले. संपूर्ण महाराष्ट्रातून ३००० प्रतिनिधी हजर होते. त्यांच्या कारकिर्दीत ज्येष्ठांसाठी मोफत आरोग्य शिबीर, संगणक प्रशिक्षण कार्यशाळा, परिसंवाद, तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने झाली. प्रत्येक महिन्यात ज्येष्ठांच्या समस्यांवर बैठक तसेच एस.पी. ऑफिसमध्ये बैठकीचे आयोजन केले जाते.

**शेवटी मी म्हणेन :** जे झालेत वृध्द आपल्यासाठी, जीवन असावे त्यांच्या सेवेसाठी, नको वृध्दाश्रम वृध्दांच्या पाठी, आपणच व्हावे ज्येष्ठांची काठी. आज समाजात मानवी जीवनातील वृध्दत्व ही अवस्था अपमानित आहे हे दुर्दैव आहे.

* * *

# कोव्हिड-१९ या आजारामुळे निधन पावलेल्या व्यक्तीच्या निकट नातेवाईकास सानुग्रह सहाय्य प्रदान

संजय औ. धारुरकर
उप सचिव, महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र शासन

**महसुल व वन विभाग**

शासन निर्णय, क्रमांक: सीएलएस-२०२१/प्र.क्र.२५४/म-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २६ नोव्हेंबर, २०२१

वाचा:- १) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १६/११/२०२१ RR, दिनांक ११ सप्टेंबर, २०२१

२) मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (सिव्हील) क्र.५३९/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्र.११२०/२०२१ मध्ये दि. ०४ ऑक्टोंबर,२०२१ रोजी दिलेले आदेश

३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.न्यायिक-२०२१/प्र.क्र.४८८/आरोग्य-५, दि.१३ ऑक्टोंबर, २०२१

**प्रस्तावना:**

मा.सर्वोच्च न्यायालयाचे रिट याचिका (सिव्हील) क्र.५३९/२०२१ आणि क्र. ५५४/२०२१ मध्ये दि. ३०.६.२०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार कोव्हिड-१९ या आजारामुळे निधन पावलेल्या व्यक्तीच्या निकट नातेवाईकास सहाय्य प्रदान करणेबाबत वर नमूद दिनांक ११ सप्टेंबर २०२१ च्या परिपत्रकान्वये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (सिव्हील) क्र.५३९/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्र.११२०/२०२१ मध्ये दि. ०४ ऑक्टोंबर, २०२१ रोजी सविस्तर आदेश निर्गमित केले आहेत. राज्य शासनाने, महसूल व वन विभागाकडून दिल्या जाणाऱ्या मदतीची रक्कम लाशथार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा होण्याकरिता योजना आखली आहे. त्यानुसार लाभार्थ्यांना सहाय्य प्रदान करणेसाठी संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येत असून त्यानुसार आधार क्रमांकाद्वारे ओळख पटवून लाशथार्थ्याच्या बँक खात्यामध्ये सहाय्याची / मदतीची रक्कम थेट जमा करण्यात येणार आहे. यास्तव, राज्यातील कोव्हिड-१९ या आजारामुळे निधन पावलेल्या व्यक्तीच्या निकट नातेवाईकास सानुग्रह सहाय्य प्रदान करणेबाबत आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

महाराष्ट्र राज्यात जी व्यक्ती कोव्हिड-१९ या आजारामुळे निधन पावली आहे, त्या मृत व्यक्तीच्या निकट नातेवाईकास रु. ५०,०००/- (रु.पन्नास हजार) इतके सानुग्रह सहाय्य राज्य आपत्ती मदत निधीमधून प्रदान करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. हे सानुग्रह सहाय्य देण्याकरिता कोव्हिड-१९ मृत्यू प्रकरणे खालीलप्रमाणे निर्धारित करण्यात येतील :-

१) RT-PCR/Molecular Tests/RAT या चाचण्यांमधून Positive अहवाल आलेल्या ज्या व्यक्तीचे अथवा आंतररुग्ण म्हणून रुग्णालयात दाखल झालेल्या ज्या व्यक्तीचे Clinical Diagnosis कोव्हिड-१९ असे झाले होते, याच व्यक्तीचे प्रकरण कोव्हिड-१९ मृत्यू प्रकरणासाठी कोव्हिड प्रकरण म्हणून समजण्यात येईल.

२) वरील प्रमाणे समजण्यात येत असलेल्या कोव्हिड-१९ प्रकरणात अशा व्यक्तीचा मृत्यू अशा चाचण्यांच्या दिनांकापासून किंवा रुग्णालयात Clinical Diagnosis च्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत झाला असल्यास अशा व्यक्तीचा मृत्यू कोव्हिड-१९ चा मृत्यू समजण्यात येईल, जरी हा मृत्यू रुग्णालयाच्या बाहेर झाला असेल अथवा त्या व्यक्तीने कोव्हिड-१९

चे निदान झाल्यामुळे आत्महत्या केली असेल तरी.

३) कोव्हिड-१९ चे प्रकरणात जर व्यक्तीचा रुग्णालयामध्ये दाखल असतांना मृत्यू रुग्णालयात झालेला असेल, जरी मृत्यू ३० दिवसाच्या नंतर झाला असेल तरी, अशा व्यक्तीचा मृत्यू देखील कोव्हिड-१९ चा मृत्यू समजण्यात येईल.

४) ज्या कोव्हिड-१९ च्या प्रकरणात व्यक्ती कोव्हिड-१९ पासून बरी झालेली नव्हती, अशा प्रकरणातील व्यक्तीचा मृत्यू रुग्णालयात अथवा घरामध्ये झालेला आहे आणि त्या व्यक्तीच्या मृत्यू प्रकरणी जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ च्या कलम १० खाली Medical Certificate of Cause of Death (MCCD) हे फॉर्म ४ व ४अ मध्ये नोंदणी प्राधिकाऱ्याला निर्गमित केले आहे अशा व्यक्तीचा मृत्यू कोव्हिड-१९ चा मृत्यू समजण्यात येईल.

५) Medical Certificate of Cause of Death (MCCD) मध्ये कोव्हिड-१९ मुळे मृत्यू याप्रमाणे नोंद नसली तरीही वरील २.१ ते २.४ मधील अटीची पूर्तता होत असल्यास, ती प्रकरणे रु. ५०,०००/- च्या सानुग्रह सहाय्यासाठी पात्र असतील.

३. हे सहाय्य मिळणेकरिता कोव्हिड-१९ या आजाराने निधन पावलेल्या व्यक्तीच्या निकट नातेईवाईकाने राज्य शासनाने या करिता विकसित केलेल्या वेब पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. यासाठी अर्जदार स्वत: किंवा सेतू केंद्रात किंवा ग्रामपंचायतीत CSC-SPV मधून अर्ज करु शकेल.

४. हा अर्ज दाखल करतांना अर्जदाराने खालील कागदपत्रे / माहिती सादर करणे बंधनकारक राहील.

१) अर्जदाराचा स्वत:चा तपशील, आधार क्रमांक किंवा आधार नोंदणी क्रमांक

२) अर्जदाराचा स्वत:चा बँक तपशील

३) मृत पावलेल्या व्यक्तीचा तपशील

४) मृत पावलेल्या व्यक्तीचे जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ खालील मृत्यू प्रमाणपत्र

५) इतर निकट नातेवाईकांचे नाहरकत असल्याचे स्वयं घोषणापत्र

५. मृत पावलेल्या व्यक्तीचा आधार तपशील किंवा आधार नोंदणी क्रमांक, उपलब्ध असल्यास व सार्वजनिक आरोग्य विभागाकडे उपलब्ध असलेल्या कोव्हिड-१९ या आजारामुळे मृत्यू पावलेल्या राज्यातील व्यक्तीच्या विदामध्ये (Data) उपलब्ध असलेल्या आधार क्रमांकाशी मृत व्यक्तीचा आधार क्रमांक जुळल्यास हा अर्ज संगणकीय प्रणालीवर आपोआप (Automatically) स्वीकृत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

६. ज्या अर्जदाराकडे मृत व्यक्तीचा आधार तपशील नसेल किंवा हा आधार क्रमांक वरील नमूद Data base मध्ये उपलब्ध आधार क्रमांकाशी जुळला नाही तर अशा अर्जदाराकडे Medical Certificate of Cause of Death (MCCD) प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास ते तपासणीसाठी संबंधित जिल्हा शल्य चिकीत्सक /म.न.पा. क्षेत्रातील मुख्य आरोग्य अधिकारी निश्चित करतील अशा वैद्यकीय अधिकाऱ्याकडे संगणकीय प्रणालीवर पाठविण्यात येईल. हे वैद्यकीय अधिकारी हे प्रमाणपत्र तपासून त्यात कोव्हिड-१९ हे मृत्यूचे कारण त्यात नमूद असल्यास त्यास संगणकीय प्रणालीवर सहाय्य मिळणेबाबतचा हा अर्ज स्वीकृत करतील.

७. वरील परिच्छेद ५ व ६ प्रमाणे जे अर्ज स्वीकृत होणार नाही त्या प्रकरणात मृत व्यक्तीच्या RT-PCR/Molecular Tests/RAT Positive अहवाल अथवा रुग्णालयात दाखल असताना करण्यात आलेल्या आरोग्य चाचण्यांच्या अहवाल तसेच इतर कोणतीही कागदपत्रे जी अर्जदाराच्या मते हा मृत्यू कोव्हिड-१९ मुळे असल्याचा सिध्द करत असेल ती अर्जदार संगणकीय प्रणालीवर upload करतील. अर्जदाराने उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे संबंधित जिल्हा शल्य चिकीत्सक मार्फत / म.न.पा. क्षेत्रातील मुख्य आरोग्य अधिकारी यांचे कडील संबधित वैद्यकीय अधिकाऱ्याकडे संगणकीय प्रणालीवर पाठविण्यात येतील. वैद्यकीय अधिकाऱ्याने ही प्रमाणपत्रे तपासुन हा मृत्यू कोव्हिड-१९ मुळे मृत्यू असल्याचे मान्य केल्यानंतर अर्जदाराचा अर्ज स्वीकृत करण्यात येईल.

८. कोणत्याही कारणास्तव परिच्छेद ५, ६ व ७ प्रमाणे अर्जदाराचा अर्ज अस्वीकृत करण्यात आला अथवा या प्रकरणी अर्जदारास काही तक्रार करावयाची असल्यास अर्जदारास राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने याकरिता गठीत केलेल्या जिल्हा स्तरीय / म.न.पा. स्तरीय तक्रार निवारण समितीकडे ऑनलाईन अपील करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. या समितीचा निर्णय

संबंधित जिल्हा शल्य चिकीत्सक / म.न.पा. क्षेत्रातील मुख्य आरोग्य अधिकारी सदर समितीच्या वतीने पोर्टलवर नमूद करतील. समितीच्या निर्णयांनुसार सहाय मिळणेबाबतचा अर्ज स्वीकृत किंवा अस्वीकृत करण्यात येईल.

९. वरील परिच्छेद ५, ६, ७ व ८ प्रमाणे अर्ज स्वीकृत झाल्यानंतर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यास सानुग्रह अनुदान वितरीत करण्यासाठी संगणकीय प्रणालीवर अंतिम मंजूरी देईल. सर्व मंजूर प्रकरणे संगणकीय प्रणालीवर सर्वसामान्य जनतेला माहिती व सूचना / हरकतीसाठी उपलब्ध राहतील. त्यानंतर ७ दिवसांनी सदर सानुग्रह सहाय्य अर्जदाराच्या बँक खात्यावर थेट (DBT) जमा करण्यात येईल. या दरम्यान मृत व्यक्तीच्या अन्य निकट नातेवाईकास अर्ज केलेल्या निकट नातेवाईकाबाबत काही तक्रार असल्यास संबंधित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडे तक्रार नोंदविण्याची मुभा असेल. अशी तक्रार प्राप्त झाल्यास, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आवश्यक ती छाननी करुन सानुग्रह सहाय्य कोणत्या निकट नातेवाईकांना देय असतील याबाबतचा अंतिम निर्णय घेतील.

१०. या योजनेची तपशीलवार कार्यपध्दती यासाठी विकसित केलेल्या वेब पोर्टलवर दर्शविण्यात आल्याप्रमाणे असेल. हे वेब पोर्टल कार्यन्वीत झाल्यानंतर सर्व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणे याबाबत आवश्यक ती प्रसिध्दी जिल्हा / तालुका / गाव पातळीवर देतील आणि सर्व संबंधितांना ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करतील.

११. यासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६, प्रधान लेखाशीर्ष २२४५ - नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ८०, सर्वसाधारण, ८००, इतर खर्च, (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१) (०२) कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यावरील खर्च (अनिवार्य, ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ ४१४१) या लेखाशीर्षाखाली उपलब्ध तरतुदीमधून भागविण्यात यावा.

१२. हा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाशी विचारविनिमय करुन तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक :अनौ.सं. ४३१/२०२१/व्यय-९, दिनांक ०१.११.२०२१ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२१११२६१६१२२१०५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.


महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

* * *

## चंद्रा, आता तुझे काही खरे नाही

डॉ. गुणवंत चिखलीकर
(९८५०१२८९३३)

पृथ्वी म्हणाली चंद्राला, आता तुझे काही खरे नाही ।
माझ्या पाठीवरील उपद्व्यापी मानव तुझ्याकडे झेपावत आहे ।।१।।
आजपर्यंत होता कवींचा तू लाडका मधुचंद्र ।
उद्या मात्र होणार आहेस तू दीनचंद्र ।।२।।
खोल खड्डे खोदून तुझ्या पोटातील सोने चांदी तो पळविणार आहे ।
माझ्या घरातील कचरा तुझ्या अंगणात टाकणार आहे ।।३।।
मोटारगाड्या फिरवून, कारखाने उभारून तुझा जीव गुदमरविणार आहे ।
आय.सी.यु. ची गरज तुला आता भासणार आहे ।।४।।
तुझ्या मांडीवरील गोजिरवाण्या हरणाला होणार पळता भुई थोडी ।
सिमेंटच्या जंगलात लपायला राहणार नाही झाडी ।।५।।
भाऊबीजेला ओवाळणारी बहिण तुला ओळखणार पण नाही ।
चंद्रा आता तुझे काही खरे नाही ।।६।।



# आधारस्तंभ



स्व. सुरेश सदाशिव रोडे यांची स्मृती.



## श्रीमती जयाताई सुरेशराव रोडे (३१४७)

पत्ता : गजानन वार्ड, श्री गजानन मंदिरासमोर, सुरक्षानगर, भद्रावती, जि. चंद्रपूर ४४२९०२


जन्मतारीख : २८/०२/१९४८

मोबाईल नं. : ८४११०४८९००

सेवा : निवृत्त मुख्याध्यापिका

छंद : वाचन, लेखन, ज्येष्ठ महिलांना मदत करणे.

## श्री. भिमाशंकर शिवलिंग स्वामी (३०९१)



पत्ता : मु.पो. झरे, ता. आटपाडी, जि. सांगली


जन्मतारीख : ०१/०६/१९४९

मोबाईल नं. : ७७६८८३४६७६, ९०९६२५४०५४

सेवा : निवृत्त प्राथमिक शिक्षक, अध्यक्ष ज्येष्ठ नागरिक संघ झरे

छंद : जनसंपर्क व जनसेवा, झरे गांवी ज्येष्ठांसाठी विरंगुळ्यासाठी मोफत विश्रांतीगृह तयार करणे.

## मुबारक दादामिया मुरसल (३१५७)



पत्ता : रोशन मंझील, फ्लॅट नं. २, गजराज कॉलनी, कुंभार मळा, विश्रामबाग–सांगली ४१६ ४१५

जन्मतारीख : १३/०२/१९५०

मोबाईल नं. : ९३७२१०००६०


सेवा : कोषागार कार्यालयातून निवृत्ती.

छंद : ज्येष्ठांना मदत, निवृत्तीधारकांना निवृत्ती वेतनाबाबत सहकार्य व आधार.

Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732
Postal Licence Reg. No. : SGL/133/2021-2023

## आधारस्तंभ

### श्री. प्रकाश प्रल्हादराव पिंपरकर (३१५६)



पत्ता : अथर्व क्लिनिक, जुना अजिसपूर रोड, एकतानगर, बुलढाणा ४४३ ००१

जन्मतारीख : ०७/०६/१९४८ **मोबाईल नं.** : ९६२३१३१२४१

सेवा : शासकीय सेवेतून नियोजन अधिकारी वर्ग-२ म्हणून निवृत्ती. सध्या फेस्कॉम पश्चिम विदर्भ प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष.

सन्मान : आईस्कॉनचे वतीने जास्त सभासद केलेबद्दल "कलिंगा" पुरस्कार. फेस्कॉम (मनोयुवा कौन्सिल) चे वतीने जास्त सभासद केलेबद्दल सन्मानित.

छंद : सामाजिक कार्यात सक्रिय राहणे.

### श्री. आनंदा विठ्ठल कांबळे (३१६१)



पत्ता : रि.स.नं. १६/५, प्लॉट नं. ६(१) पी.डी. भोसलेनगर, आर.के. नगर, मोरेवाडी, ता.करवीर, पो.आर. के. नगर ४१६ ०१३ कोल्हापूर

जन्मतारीख : ०१/०६/१९६३ **शिक्षण** : D.C.E. & R.E.

मोबाईल नं. : ९६२३८५८५२६, ९४०४११७६३५

Email-ID : anandakamble63@gmail.com

सेवा : जिल्हा परिषदेत उपअभियंता वर्ग-१ म्हणून निवृत्त

छंद : जनसंपर्क, अनुभवाचा फायदा ज्येष्ठांना देणे.

### श्री. मनोहर जंगलु मागाडे (३१६०)



पत्ता : खारे मळा, शिवप्रेमी चौक, कांचनदीप-२,कुपवाड, ता. मिरज, जि. सांगली ४१६ ४३६

जन्मतारीख : ०२/१०/१९५८ **मोबाईल नं.** : ९६७३३६६८४३

शिक्षण : B.A., I.T.I. & MS-CIT

सेवा : निवृत्त सहाय्यक पोलीस फौजदार. साहित्यिक, लेखक, कवी, पत्रकारिता, नाटककार.

छंद : वकिली शिक्षण सुरु, गरिबांचा वकील म्हणून नावलौकीक मिळविणेचा प्रयत्न.

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐/पत्ता सोडून गेले ☐/पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :
श्री. अंजुमन खान
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४

**PRINTED MATTER**

प्रति,